**<u>रेग्युलर दिवाणी मुकदमा नं. ४४/२००९ मधील नि. ६० वरील आदेश</u>**

प्रस्तुत अर्ज वादीने ग्रामपंचायत मिळकत नं. ७७ मौजे कोकिसरे ता. पाटण, जि. सातारा या मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. १ व २ बांधकाम करत आहेत त्यास तात्पुरता मनाई हुकूम मिळणे करीता दाखल केलेला आहे.

०२. थोडक्यात हकीकत अशी की,

वादी/अर्जदारांनी मौजे कोकिसरे ता. पाटण, जि. सातारा येथील शेत मिळकती, गांवठाण मिळकती बाबत मालकी हक्क व वहिवाटी बाबत जाहीरनामा मिळावा म्हणुन व कायम मनाई हुकूम मिळणे करीता दावा दाखल केलेला आहे. वादी/अर्जदाराच्या म्हणण्या नुसार अर्जातील ही गावठाण मिळकत नं. ७७ त्याच्या आईची वडिलार्जीत मालकी व कब्जे वहिवाटी असुन वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये पुर्वीच तोंडी वाटप होवुन दाव्यातील सर्व मिळकती वादीचे पुर्व हक्कदार रामु व नारु यांच्या स्वतंत्र हिश्यास दिल्या आहेत तशी नोंद रेकॉर्डला झालेली आहे तेंव्हा पासुन ते वेग वेगळया वहिवाटी करत आहेत, गावठाण मिळकत ग्रामपंचायत नं. ७७ व त्या पाठिमागील खुली जागा वादीचे पुर्व अधिकारी नारुच्या दोन मुली चंद्राबाई व गिरजाबाई यांना मालकी हक्काने प्राप्त झाल्या त्याचा त्या उपभोग घेत होत्या, त्यांच्या मृत्युपश्चात वादी या घर मिळकतीचे व खुल्या जागेचा उपभोग घेत आहेत. त्या ठिकाणी बैल बांधणे, जळण ठेवणे, शेतीची औजारे ठेवणे असा वापर करत होते, दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. १ व २ यांनी या ग्रामपंचायत मिळकत नं. ७७ रेकॉर्ड मध्ये वादींच्या अपरोक्ष त्यांच्या नावाची खोटी बेकायदेशीर नोंद करुन घेतली व त्यामध्ये पक्क्या स्वरुपाचे बांधकाम करुन दावा मिळकतीच्या मुळ स्वरुपात बदल करणेच्या तयारीत आहेत म्हणुन त्यांनी बांधकाम करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम द्यावा अशी विनंती केली.

०३. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी नि.क्र. ६७ वर लेखी म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केलेला आहे. त्यांनी वादी किंवा वादीच्या आईचा या मिळकतीमध्ये कधीही कब्जा नव्हता नाही, दाव्यामध्ये दिलेली वंशावळ चुकीची आहे, या मिळकतीस वादीचा कुठलाही संबंध राहिलेला नाही तर रेकॉर्ड सदरी प्रतिवादी क्र. १ व प्रतिवादी क्र. २ यांचे एकत्र कुटूंबाची मिळकत म्हणुन कुटूंब प्रमुख म्हणुन प्रतिवादी क्र. १ ची नोंद झालेली आहे. प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. २ च्या नावे मिळकत नोंदविण्या करीता

अर्ज दिल्या वरुन ग्रामपंचायत यांच्या दि. २६/५/१९९१ च्या मासिक सभेच्या ठरावा नुसार प्रतिवादी क्र. २ ची नोंद या मिळकतीस झालेली आहे ते त्याचा उपभोग घेत आहेत सदरील मिळकत प्रतिवादींचे मुळचे घर असुन फार वर्षा पासुन प्रतिवादीची नोंद ग्रामपंचायत रेकॉर्डला आहे. प्रतिवादी क्र. ६ च्या वडिलांनी या मिळकती बाबत प्रतिवादी क्र. १ व २ विरुध्द दिवाणी दावा क्र. ७२/९३ दाखल केला होता तो फेटाळण्यात आला त्याचे अपिल क्र. ३०४/९८ सुध्दा फेटाळण्यात आले अशा स्वरुपाचा अर्ज वादी यांनी या पुर्वी देखिल नि.क्र. ५ व ७ ला दिलेले असुन ते अर्ज चालविण्याचा कधीही आग्रह धरला नाही. प्रतिवादी यांच्या मिळकतीमध्ये दुरुस्ती करत असताना प्रतिवादी क्र. ६ च्या सांगण्या वरुन हा खोटा अर्ज दिला आहे, वादीने दाखल केलेला नकाशा खोटा व लबाडीचा असुन रे.फौ. ख. नं. ४३/१० मध्ये कोकिसरे ग्रामपंचायतीच्या ग्राम सेवकाने १९७० ते १९९० अखेरचे रेकॉर्ड उपलब्ध नाही असा दाखला दिलेला असताना प्रतिवादी क्र. ६ च्या सांगण्या वरुन चुकीचा दाखला दिलेला आहे. नि.क्र. ५ व ७ या अर्जाला प्रतिवादीने म्हणणे दिलेले आहे ते देखिल या म्हणण्याचा भाग समजावा, वादीच्या लाभात न्यायाचा तौलिक तराजू नाही व प्रतिवादीचे नुकसान होणार आहे या कारणास्तव अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

०४. खालील मुददे प्रस्तुत केले व त्यावरील निष्कर्ष खालील प्रमाणे आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. वादीने प्रथम दर्शनी केस सिध्द केली काय? | ........ नाही |
| २. वादीच्या लाभात न्यायाचा तौलीक तराजू आहे काय? | .........नाही |
| ३. अर्ज फेटाळल्यास वादीचे कधीही भरून न येणारे नुकसान होणार आहे काय? | ........नाही |
| ४. काय आदेश ? | ........ अर्ज फेटाळण्यात येतो. |

## <u>कारणमिमांसा</u>

०५. वादींनी त्यांचे प्रथमदर्शनी केस सिध्द करणे करीता ग्रामपंचायत

कोकिसरे यांनी दि. ६/१२/२०१३ रोजी दिलेला दाखला, छायाचित्रे, रे.दि.मु.नं. २३/०८ मध्ये दाखल केलेला अर्ज त्यावर झालेला आदेश, नि.क्र. १ ची प्रत त्यावर झालेला आदेश, ग्रामपंचायत कोकिसरे यांच्या दि. ८/६/१९६७ सालाच्या ठरावाची नक्कल, १९६० ते १९६५ चा ग्रामपंचायत मिळकत नं. २१ चा नमुना क्र. ८ चा उतारा दाखल केला आहे. तर प्रतिवादींनी १९९०—९१ सालचा नमुना क्र. ८ चा उतारा, ग्रामपंचायत मिळकत नं. ७७ चा उतारा, दिवाणी दावा क्र. ७२/९३ मध्ये झालेला आदेश, मिळकत नं. ७७ चा २००२ सालचा नमुना क्र. ८ चा उतारा दाखल केलेले आहेत. वादी, प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या वकिलांनी तोंडी युक्तिवाद केला.

**<u>मुद्दा क्र. १ बाबत :—</u>**

०६. संपुर्ण कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर असे निदर्शनास येते की, वादींनी जाहीरनाम्या करीता २००९ सालीच दावा दाखल करुन नि.क्र. ५ तसेच नि.क्र. ७ वर प्रतिवादी क्र. १ ते ५ विरुध्द तात्पुरता मनाई मिळावा अशी विनंती केलेली आहे. दोन्ही अर्ज दाव्या सोबत दाखल केलेले आहेत त्यावर प्रतिवादी क्र. १ व २ यांनी तेंव्हाच लेखी म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविलेला आहे परंतु वादींनी हे दोन्ही अर्ज चालविले नाहीत किंवा त्यावर आदेश मिळविण्याचा कुठलाही प्रयत्न केलेला नाही व प्रस्तुत अर्ज दाखल करुन प्रतिवादी हे दावा कलम १ब मधील अ.क्र. २ वरील ग्रामपंचायत मिळकत नं. ७७ मध्ये बांधकाम करत आहेत व त्यांच्या विरुध्द तात्पुरता मनाई हुकूम द्यावा अशी विनंती केली. दाव्यामध्ये वादींनी या मिळकतीचे पुर्वीच वाटप हावुन मिळकती त्यांच्या पुर्वाधिका—यांना ताब्यात दिलेल्या होत्या, त्यानंतर वादी हे त्या मिळकतींचा उपभोग घेत आहेत असे कथन त्यांनी केलेले आहे, त्यांनी दिलेली वंशावळ त्यामधील मुळ पुरुष धोंडीला, नायकु नावाचा मुलगा होता हे स्पष्टपणे नाकारलेले आहे तर मुळ पुरुष धोंडी याचा मुलगा कुशाबा यास गणु व रामा अशी दोन मुले होती, रामाला नारु व जोती अशी मुले होती, नारुच्या दोन मुली गिरजाबाई व चंद्रबाई होत्या, जोतीला कुठले वारस नव्हते, वादी गिरजाबाई व चंद्राबाईची मुले आहेत हे त्यांनी कैफियतीमध्ये मान्य केलेले आहे परंतु या गिरजाबाई व चंद्राबाई यांनी त्यांचा हिस्सा सोडुन दिलेला आहे व तशी नोंद रेकॉर्डला झाल्याचे कैफियतीमध्ये कथन केलेले आहे. वादींनी ही मिळकत अर्जामधील त्यांच्या कब्जे वहिवाटीस असल्याचा दावा केलेला आहे तर प्रतिवादी घराचे बांधकाम करुन

मुळ स्वरुपात बदल करत आहेत असे कथन केलेले आहे. जर वादींचे वाद मिळकतीवर तोंडी वाटपा प्रमाणे पुर्वी पासुन कब्जा होता तर प्रतिवादींनी त्यांना कधी बेदखल केले याबाबत कुठलेही स्पष्टिकरण वादींनी दिलेले नाही, वादींनी त्यांच्या अर्जामध्ये परिच्छेद क्र. ५ मध्ये बेकायदेशीररीत्या प्रतिवादी क्र. १ व २ दावा मिळकती मध्ये पक्क्या स्वरुपाचे बांधकाम करुन दावा मिळकतीच्या मुळ स्वरुपात बदल करण्याच्या तयारीत आहेत असे कथन त्यांनी केलेले आहे, म्हणजेच अद्याप त्या ठिकाणी पुर्ण बांधकाम पक्क्या स्वरुपाची झाले नाही असे वादी यांनी दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. दाव्यामध्ये ग्रामपंचायत मिळकत नं. ७७ चे वर्णन पत्र्याचे शेड त्यामध्ये आंबा, फणस, निलगिरी इ. झाडे असे वर्णन केलेले आहे या ग्रामपंचायत मिळकत नं. ७७ मध्ये खुली जागा असे नमुद केलेले नाही परंतु प्रस्तुत अर्ज नि.क्र. ६० मध्ये मात्र या ग्रामपंचायत मिळकत नं. ७७ मध्ये खुली जागा देखिल आहे असे कथन केलेले आहे तर या मिळकतीचा जुना नं. ६१ व २१ असे होते असे देखिल कथन अर्जात केलेले आहे परंतु दाव्यामध्ये फक्त २१ जुना नंबर होता, ६१ होता असे नमुद केलेले नाही. प्रतिवादीने म्हणणे दाखल करुन वादींची कधीही वहिवाट नव्हती, त्यांचा कुठलाही संबंध नाही असे स्पष्टपणे कथन केलेले आहे, वादीने जो ग्रामपंचायतीचा दाखला दाखल केला आहे त्यामध्ये नारु रामा पवार याचा मिळकत नं. २१ दाखविला आहे त्याच्या दक्षिण बाजुस प्रतिवादी क्र. ६ याची मिळकत नं. २२, ६२ व ७८ दाखविली आहे तर त्याच्या दक्षिणेस प्रतिवादी क्र. १ चंदर रामा पवार याची मिळकत नं. २३, ६३, ६९ अशी दाखविली आहे व हा दाखला मिळकत नं. २१ च्या १९६० ते १९६५ च्या आकारणी नुसार दिल्याचे त्यात नमुद केलेले आहे.

०७. वादींच्या वकिलांनी तोंडी युक्तिवादामध्ये प्रतिवादींनी वंशावळ नाकारलेली नाही या मिळकतीचा जुना नं. २१ होता तो वादीचे आजोबा नारु यांच्या नावाने होता तशी रजिस्टरमध्ये नोंद आहे. फेरफार नं. १६८४ प्रमाणे वादीच्या आईचे नाव लागले, वादी मिळकतींचा उपभोग घेत आहेत रत प्रतिवादी बेकायदेशीररीत्या चंदरचे नाव लावुन घेतले, दिवाणी दावा ७२/९३ मध्ये वादी पार्टी नव्हते, दिवाणी दावा क्र. २३/०८ मध्ये वादीने त्रयस्त पार्टी म्हणुन अर्ज केला तो मंजुर केला परंतु वादींनी प्रस्तुत प्रतिवादींनी आदेशा प्रमाणे दुरुस्ती केली नाही म्हणुन दावा खारीज करण्यात आला, वादींच्या आईने हक्क सोडुन दिला याबाबतचा दस्त नाही, प्रतिवादींची नोंद बोगस आहे करीता अर्ज मंजुर करावा अशी विनंती करुन ***कोंडीबा नवगिरे —वि— दशरथ नवगिरे २०१३(६)***

***महा. एमएलजे २३१*** या न्याय निवाडयाचा हवाला दिला. तर प्रतिवादींच्या वकिलांनी प्रस्तुत अर्ज कोणत्या तरतुदी खाली केला आहे हे नमुद केले नाही, मुळ दाव्यात वादींनी त्यांच्या खरेदीची मिळकत आहे असे जाहीर करुन मागितले परंतु खरेदीचा दस्त दिला नाही, केंव्हा खरेदी केली, कोणी खरेदी केली हे नमुद केले नाही त्याचा पुरावा नाही त्यामुळे दावा चालु शकत नाही व ठरावाचा दावा तीन वर्षाच्या आत केला नाही असा युक्तिवाद करुन वादींच्या आईने अर्ज देवुन प्रतिवादी क्र. १ च्या नावे जमिनी केल्या व हक्क सोडला, प्रतिवादींनी वंशावळ नाकारली आहे, धोंडीला नायकु नावाचा मुलगा नव्हता तर प्रतिवादी क्र. ६ च्या सांगण्या वरुन खोटा दावा केला आहे, खोटा अर्ज केला आहे, नि.क्र. ५ व ७ चा अर्ज प्रलंबित असताना तो अर्ज चालविण्याचा प्रयत्न केला नाही, नकाशा खोटा दाखल केला आहे, नमुना क्र. ८ उता—यामध्ये कर्जाची नोंद केली परंतु प्रतिवादींनी कुठलेही कर्ज घेतले नाही याचा दाखला संबंधित बॅकेने दिलेला आहे. यावरुन वादींनीच संगणमत करुन खोटा दाखला मिळविला व तो स्वच्छ हाताने आले नाहीत असा युक्तिवाद केला व जुना ग्रामपंचायत मिळकत नं. ६५ चा नमुना क्र. ८ उता—यामध्ये वर्णन वेगळे आहे तर आताचे वर्णन वेगळे आहे, सुरुवातीला प्रतिवादी क्र. १ ची नोंद होती आता प्रतिवादी क्र. २ ची नोंद आहे, वादींचा ताबा असल्याबाबत कुठलाही पुरावा दिला नाही, वादीच्या आईची स्वकष्टार्जीत मिळकत नाही त्यामुळे तोंडी हिस्सा सोडुन देता येतो म्हणुन ***गंगाधर हर्डे —वि— उत्तम हर्डे २००८(३) ऑल एमआर १५२*** या न्याय निवाडयाचा हवाला दिला व १९७३ साला पासुन आजपर्यंत फेरफार प्रतिवादींच्या नावे आहे, वादींच्या कब्जा बाबत कुठलाही पुरावा नाही, प्रतिवादींनी मोडकळीस आलेल्या शेडमध्ये बांधकाम करत आहेत, वादींच्या पाच भावांची घरे वेग वेगळी आहेत, वादींची मिळकत वेगळी आहे, वादींना प्रथमदर्शनी केस नाही म्हणुन खर्चासह अर्ज फेटाळावा अशी मागणी केली. तर वादींच्यावकिलांनी हक्कसोड नोंद घर मिळकतीबाबत नाही ती फक्त शेत मिळकतीबाबत आहे असे निदर्शनास आणुन दिले.

०८. दोन्ही वकिलांचा युक्तिवाद, समोर आलेला पुरावा याचा विचार केल्यानंतर असे निदर्शनास येते की, प्रतिवादींनी वादींच्या आईची मालकी होती हे नाकारलेले नाही तर वादीच्या आईने प्रतिवादी क्र. १ च्या लाभात हक्क सोडुन दिला असे कथन केलेले आहे. वादींनी फेरफार नं. १८९६ चा उतारा नि.क्र. २१ वर दाखल केलेला आहे त्याचे अवलोकन केल्यानंतर असे दिसुन येते की, गिरजाबाई व चंद्राबाई यांनी अर्ज

देवुन शेत मिळकतींना प्रतिवादी क्र. १ चंदर रामा पवार याचे नाव लावुन दिले हा फेरफार फक्त शेत मिळकती बाबत आहे, घर मिळकती बाबत नाही, प्रतिवादींनी जो न्याय निवाडा दाखल केलेला आहे त्यामध्ये वडिलार्जीत एकत्र कुटूंबा मधील मिळकतीतील हक्क तोंडी सोडुन देता येवु शकतो फक्त स्वकष्टार्जीत मिळकती मधील हिस्सा तोंडी सोडुन देता येत नाही असे या गंगाधर प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने ठरविले होते. प्रस्तुत अर्ज फक्त एका ग्रामपंचायत मिळकती बाबत आहे त्यामुळे या अर्जा पुरता विचार करणे गरजेचे आहे. या फेरफार नं. १८९६ मध्ये घर मिळकती बाबतचा उल्लेख केलेला नाही त्यामुळे वादींच्या वकिलांनी जो युक्तिवाद केला की, घर मिळकती बाबत हक्कसोड नाही यामध्ये तथ्य दिसुन येते, या मिळकती वादींच्या आईने त्यांचे वडिल नारायण रावजी पवार यांच्याकडुन मिळालेल्या आहेत ही बाब या फेरफार नं. १६६४ वरुन स्पष्ट होते त्यामुळे वादींच्या आईला तोंडी हिस्सा सोडुन देता येवु शकतो ही बाब विचारात घेवुन प्रस्तुत अर्जातील वाद विचारात घेणे गरजेचे आहे. वादींनी दाव्यामध्ये ग्रामपंचायत मिळकत नं. १३३अ, ७७, व ७७ ते ७९ मागिल खुली जागा अशा तीन मिळकती मध्ये त्यांच्या पुर्वाधिका—यांना १/२ हिस्सा मिळाला होता असे कथन केलेले आहे, त्यांच्या वंशावळी प्रमाणे प्रतिवादी क्र. १ ते ५ हे त्यांचे आजोबा रामा यांच्या भावाचे वारस आहेत ही बाब देखिल स्पष्ट होते. जर वादींनी पुर्वी झालेल्या वाटपा प्रमाणे मिळकतीचा कब्जा होता तर प्रतिवादींनी त्यांना कधी बेदखल केले ही बाब वर उल्लेख केल्याप्रमाणे त्यांनी स्पष्ट केलेली नाही, १९६०—६५ एवढा एक दाखला वगळता वादींच्या आईचा किंवा वादींची नोंद मालक किंवा कब्जेदार म्हणुन या वाद मिळकतीला झाली हे दर्शविणारा कुठलाही पुरावा वादींनी दाखल केलेला नाही.

०९. प्रतिवादींच्या वकिलांनी तोंडी युक्तिवादात दावा मिळकतीचे पुर्वीचे वर्णन व आताचे वर्णन भिन्न आहे व पुर्वी सारखी परिस्थिती आज रोजी नाही असा जोरदार युक्तिवाद करुन ग्रामपंचायत मिळकत नं. ६५ च्या गाव नमुना क्र. ८ उता—यामध्ये असलेले वर्णन वेगळे आहे तर आताचे वर्णन वेगळे आहे असा युक्तिवाद केला. प्रस्तुत अर्जामध्ये ग्रामपंचायत मिळकत नं. ७७ जुना नं. २१ चे वर्णन पत्र्याचे शेड, आंबा, फणस, निलगिरी झाडे असे केलेले आहे तर दाव्या सोबत दाखल केलेल्या या ग्रामपंचायत मिळकत नं. २१ च्या नमुना क्र. ८ उता—यामध्ये ४ खण दुघई घर समोर सोफा, ४ खणाचा व कौलाचा व खुली जागा ३० X २० असे नमुद केलेले आहे. सर्व प्रथम हा

उतारा कोणत्या वर्षा करीता आहेत त्याचप्रमाणे कशाचे आधारे हे नाव लागले याचा उल्लेखया उता—यामध्ये केलेला नाही. थोडया वेळा करीता हा उतारा खरा आहे असे जरी गृहीत धरले तरी या उता—या मधील मिळकतीचे वर्णन व सध्याचे वर्णन हे वेगळे असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते, दाव्यामध्ये देखिल पत्र्याचे शेड व झाडे असाच उल्लेख केलेला आहे परंतु जे उतारे वादींनी या मिळकतीचे दाखल केले त्यामध्ये वर्णन मात्र वेगळे आहे, या मिळकतीचा अजुन एक नंबर ६१ होता असे वादींचे म्हणणे आहे परंतु प्रतिवादी लक्ष्मण याच्या नावे ही ग्रामपंचायत मिळकत नं. ६१ ग्रामपंचायत रेकॉर्डला १९९५, १९९६ साली नोंदविल्याचा उतारा वादीनेच स्वत:हुन दाखल केला आहे. या उता—यामध्ये मिळकतीचे वर्णन पुर्वाभिमुखी असल्याचे शेड दोन खण दुघई मिळकत माती व पत्र्याची ज्याची पुर्व पश्चिम लांब २०० फुट व दक्षिणोत्तर ६२ फुट असे नमुद केलेले आहे. या दोन्ही उता—यां वरुन हे दिसुन येते की, वाद मिळकतीचे केलेले वर्णन मिळते जुळते नाही ही मिळकत प्रतिवादी लक्ष्मण याच्या नावाने १९९५—९६ सालात नोंदविलेली आहे त्यामध्ये त्याचे स्वरुप वेगळे आहे यावरुन मिळकतीचे वर्णन वेग वेगळे आहे हे स्पष्ट होते. नेमके प्रतिवादी कुठल्या भागामध्ये बांधकाम करतात याचा स्पष्ट बोध होत नाही. प्रतिवादी क्र. १ ते ५ हे वादीच्या आईचे सख्खे चुलत भाउ आहेत त्यांचा देखिल वडिलार्जीत मिळकतीमध्ये हिस्सा आहे ही बाब प्रथमदर्शनी दिसुन येते त्यामुळे जर वादीच्याम्हणण्या मध्ये पुर्वीच वाटप झालेले आहे तरप्रतिवादीच्या हिश्यास आलेली घर मिळकतीमध्ये त्यांचा ताबा आहे त्यामध्ये त्यांच्या नावाने असलेली घरे आहेत ही बाब प्रथमदर्शनी नाकारता येत नाही, प्रतिवादींनी परस्पर ग्रामपंचायतीला स्वत:चे नाव लावुन घेतले किंवा केस ही बाब पुराव्याअंती निश्चित ठरणार आहे या प्रसंगी वादींनी जी वाद मिळकत म्हणुन दर्शविलेली आहे त्यामध्ये प्रतिवादींची मालकी व वहिवाट असल्याचे स्पष्टपणे दिसुन येते व त्यांचा देखिल वडिलार्जीत मिळकतीमध्ये हिस्सा आहे ही बाब वादी देखिल नाकारु शकत नाहीत, अशा परिस्थितीमध्ये वादीच्या जागेवर प्रतिवादी बांधकाम करत आहेत या म्हणण्यामध्ये कुठलेही तथ्य आढळुनयेत नाही.

१०. वादींनी त्यांच्या म्हणण्यास पुष्टी देण्या करीता कोंडीबा नवगिरे या न्याय निवाडयाचा हवाला दिलेला आहे त्यामध्ये फार पुर्वी पासुन असलेला ताबा रेकॉर्डला असलेल्या नोंदी यामुळे त्या व्यक्तिस हक्क प्राप्त होत नाही असे या न्याय निवाडयात ठरविले होते. कायदयाची ही प्रचलित परिस्थिती आहे त्याबाबत वाद असण्याचे कुठलेही

कारण नाही परंतु प्रस्तुत प्रकरणामध्ये परिस्थिती भिन्न आहे, प्रतिवादींची नोंद ग्रामपंचायत मिळकतीला १९६१ साला पुर्वी पासुन आहे त्यांचा कब्जा देखिल असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते, प्रतिवादींचा देखिल वडिलार्जीत मिळकतीमध्ये हिस्सा आहे हया सर्व बाबींचा विचार केल्यानंतर वादीने जो न्याय निवाडा दाखल केला आहे तो या प्रस्तुत प्रकरणामध्ये लागु होत नाही. तर प्रतिवादींच्या वतीने ***कामेश्वर सिंग —वि— म्युनिसिपल कॉर्पो. ऑफ ग्रेटर बॉम्बे १९९६(२) बी.सी.जे. ४३३*** या न्याय निवाडयाचा हवाला दिला आहे. यामध्ये वादीना प्रथमदर्शनी केस, न्यायाचा तौलिक तराजु व कधीही न भरुन येणारे नुकसान हया बाबी सिध्द करणे गरजेचे आहे केवळ प्रथमदर्शनी केस सिध्द केली म्हणुन तात्पुरता मनाई हुकूम मिळणेचा अधिकार वादींना प्राप्त होत नाही असे ठरविले होते तर ***मेकर्स डेव्हलपर्स सर्व्हिसेस प्रा.लि. —वि— एम. विश्वेश्वरैया इंडस्ट्रियल रिसर्च २०१२(३) सिव्हील लॉ जनरल ११४*** या प्रकरणमध्ये तात्पुरता मनाई हुकूम देताना प्रथमदर्शनी न्यायाचातौलिक तराजु, कधीही न भरुन येणारे नुकसान या व्यतिरीक्त पक्षकारांची वागणुक हे देखिल पाहणे गरजेचे आहे असे मत मा. सर्वोच्च न्यायालयाने मांडलेले आहे. तर ***बेस्ट सेलर्स रिटेल इंडिया प्रा.लि. —वि— आदित्य बिर्ला नुओ लि. २०१३(३) सिव्हील लॉ जनरल २९८*** या प्रकरणात देखिल प्रथमदर्शनी केस सिध्द केली व न्यायाचा तौलिक तराजु, कधीही न भरुन येणारे नुकसान हया बाबी जरी सिध्द केल्या नसतील तरी तात्पुरता मनाई हुकूम देत येत नाही असे ठरविले होते. ***विद्याधर मोकल —वि— बर्कतुल्लाह शेख २०१३(४) महा.लॉ. जनरल ५०५*** या न्याय निवाडया मध्ये देखिल वरील प्रमाणेच मत उच्च न्यायालयाने मांडलेले आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये वादींनी वाद मिळकतीचे वर्णन हे स्पष्ट केलेले नाही २००९ साला पासुन मनाई हुकूमाचा अर्ज त्यांनी चालविण्याचा प्रयत्न केला नाही वादीचा वाद मिळकतीवर कब्जा असल्याबाबत प्रथमदर्शनी पुरावा दाखल केलेला नाही तर प्रतिवादीच्या असलेल्या नोंदीबाबत त्यांचे वडिलार्जीत मिळकतीमध्ये हक्क आहे हिस्सा आहे ही बाब प्रथमदर्शनी दिसुन येते, प्रतिवादींनी पुर्वी दाखल केलेला दावा खारीज झाला त्या पुर्वीच्या दाव्यात वादींना माहिती नव्हती ग्रामपंचायतीने दिलेला नकाशा या सर्व बाबी या क्षणी महत्वाच्या नाहीत तर आत्ता ताबा प्रतिवादींचा आहे त्यांचा वडिलार्जीत घर मिळकतीमध्ये हक्क आहे वादींच्या आईने फार वर्षा पुर्वी शेत मिळकती मधील हक्क सोडुन दिलेला आहे तशी नोंद झालेली आहे घर मिळकती बाबत नोंद झालेली नाही

परंतु घर मिळकती मधील हक्क सोडुन दिला या प्रतिवादीच्या कथनामध्ये शक्यता दिसुन येते व ती नाकारता येत नाही, वादींचा वाद मिळकतीवर पुर्वी पासुन कब्जा नाही या सर्व कारणांचा विचार करुन मी हया निष्कर्षास आलेलो आहे की, वादींनी प्रथमदर्शनी केस सिध्द केली नाही म्हणुन मुद्दा क्र. १ नकारार्थी उत्तरीत करत आहे.

**मुद्दा क्र. २ व ३ बाबत :—**

११. मुद्दा क्र. १ वरील नकारार्थी निष्कर्षामुळे वादीच्या लाभात न्यायाचा तौलिक तराजु नाही प्रतिवादींनी त्यांच्या मोडकळीस आलेल्या घराची दुरुस्ती करत आहेत त्यामुळे जर मनाई हुकूम दिला तर प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे म्हणुन मुद्दा क्र. २ व ३ नकारार्थी उत्तरीत करुन खालील आदेश देत आहे.

## आदेश

१. अर्ज फेटाळण्यात येतो.

२. खर्चाचा आदेश दाव्याच्या अंतिम निकालाच्या वेळी करणेत येईल.

ठिकाण : पाटण
दिनांक : १३/०१/२०१४

(किरण रं. देशपांडे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,पाटण